हिंदु विवाह अर्ज क्र. ५१/२०२५
निवृत्ती वि. मुक्ता
नि.क्र. ०/३५

**अर्जदारातर्फे सा.क्र. १ यांचा उर्वरीत सरतपास विद्वान वकील श्री. एस. सी. बिराजदार यांचेमार्फत शपथेवर सुरुः–**

१६. मी गैरअर्जदार नांदायला येत नाही म्हणुन पालवी सामाजिक संस्था संचलित कौटुंबिक सल्ला मार्गदर्शन केंद्र, राजगुरू नगर, खेड, जि. पुणे येथे दि.२९/०६/२०२१ रोजी अर्ज दिला होता. मला यादी नि.क्र. ३७ सोबत अ.क्र.१ वरिल अर्जाची साक्षांकित प्रत दाखवली असता सदरचा अर्ज तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर अर्जास **नि.क्र. ४२** देण्यात येते. त्याअन्वये संस्थेने गैरअर्जदार हिला नोटीस काढली होती. गैरअर्जदाराने सदरची नोटीस घेण्यास नकार दिला. त्या संस्थेमध्ये मी प्रत्येक तारखेला हजर होतो. मी हजर असल्याबाबत संस्थेच्या रोजनाम्यावर सही केली आहे. सदरचा रोजनामा यादी नि.क्र. ३७ सोबत अ.क्र. २ वर दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. ४३** देण्यात येते.

१७. गैरअर्जदार हिचे वडील व भावांनी मला मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. यासंदर्भात मी विश्रांतवाडी पोलीस ठाणे, पुणे येथे अर्ज दाखल केला होता. त्या अर्जानुसार पोलीस ठाण्यात एन.सीची दि.३०/०३/२०२२ रोजी नोंद करण्यात आली. त्या एन.सी. क्र.४३१/२०२२ ची प्रत मला पोलीस ठाण्यातुन प्राप्त झाली. त्यावर पोलीस ठाण्याचा शिक्का व सही आहे. सदर एन.सी. ला **नि.क्र. ४४** देण्यात येते.

**उलटतपास गैरअर्जदारतर्फे विद्वान वकील श्री. एस. आर. शेख यांच्यामार्फत सुरू:–**

१८. माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले आहे. माझे व गैरअर्जदाराचे लग्न माझ्या वडीलांनी व गैरअर्जदाराच्या मामांनी जमवले. लग्न झाल्यानंतर दोन दिवसांनी आम्ही कुळदैवताला गेलो होतो. लग्न झाल्यानंतर आम्ही फिरायला गेलो नव्हतो. लग्न झाल्यानंतर मी

व गैरअर्जदार गोजेगाव येथे एक महिना राहिलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी व गैरअर्जदार पुणे येथे माझ्या बहिणीच्या घराच्या बाजुला राहयला आलो. त्याठिकाणी आम्ही एक वर्ष राहिलो. मी पुणे येथे विश्रांतवाडी पोलीस ठाणे येथे होमगार्ड म्हणुन कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी लग्नाच्या पुर्वीपासून नौकरीनिमित्त पुणे येथे राहतो. विश्रांतवाडी पोलीस ठाणे, पुणे येथे मी होमगार्ड म्हणुन २००८ साली रुजू झालो. मी नौकरीनिमित्त गोजेगाव येथुन पुणे येथे ये जा करत होतो. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, ज्या ज्या वेळी मला डयुटी असेल त्या त्या वेळी मी पुणे येथे जात होतो.

१९. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१६ साली भोसरी येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिका बसवर वाहन चालक म्हणुन नौकरी करत होतो. त्या नौकरीचा वेळ सकाळी ६ ते दुपारी ३ पर्यंत होता. मी चालक म्हणुन २०१७ पर्यंत नौकरी केली. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार ही लग्नापुर्वी स्टाफ नर्स म्हणुन नौकरी करत होती हे माझ्या घरच्यांना माहित होते. लग्न झाल्यानंतर पहिल्या दिवाळीला मी गैरअर्जदार हिच्या घरी गेलो नाही कारण मी माझ्या घरी माझ्या आई वडीलांकडे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार लग्नानंतर पहिल्या दिवाळीला तिच्या घरी गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिवाळी झाल्यानंतर गैरअर्जदार हिला घेण्याकरिता मी गैरअर्जदाराच्या गावाकडे आलो होतो.

२०. हे म्हणणे खरे नाही की, दिवाळी नंतर गैरअर्जदाराला तिच्या गावाकडे आणण्याकरिता गेलो असता माझा पाहुणचार केला नाही व मला सोन्याची अंगठी केली नाही म्हणुन मी गैरअर्जदारासोबत कुरबुर सुरू केली. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ पासून ते २०१९ पर्यंत मी पुणे येथे माझ्या बहिणीच्या घराच्या बाजुला राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१९ ते २०२० पर्यंत मी व गैरअर्जदार गावडे यांच्या मालकीच्या रूममध्ये पुणे येथे राहिलो. गैरअर्जदार ही सन २०१८ मध्ये माझ्यापासून गरोदर राहिली. २०१८ साली गैरअर्जदार हिला बाळांतपणासाठी मी माहेरी पाठवले. माझ्या मुलाची जन्मतारिख

२८/०६/२०२० आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार गरोदर असताना तिचा योग्य उपचार मी केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाचा जन्म झाला त्यावेळी मी मुलाला पाहण्याकरिता हॉस्पीटलला किंवा गैरअर्जदाराच्या माहेरी गेलो नाही.

२१. हे म्हणणे खरे नाही की, लग्नामध्ये गैरअर्जदाराच्या आई वडीलांनी ३,५०,०००/– रूपये हुंडा, ५ तोळे सोने व गृहउपयोगी सर्व साहित्य दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस खात्यामध्ये नौकरीला आहे व माझ्याकडे ६ एकर जमिन आहे असे सांगुन माझ्या वडीलांनी गैरअर्जदारासोबत माझे लग्न जमवले होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्न झाल्यानंतर माझे आई, वडिल, बहिण हे गैरअर्जदाराला अपशब्द बोलुन अपमानास्पद वागणुक देत होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हिस माझे आई, वडील तिला अपमानास्पद वागणुक देत आहेत असे मला सांगितले असता मी तिला सांगितले की मला तिच्यासोबत राहयचे नाही, माझी हौस बाहेर पुर्ण होत आहे.

२२. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई वडील, बहिण गैरअर्जदाराला त्रास देत होते हे मी डोळयांनी पाहिले म्हणुन मी व गैरअर्जदार मिळुन पुण्याला राहण्याचा निर्णय घेतला. हे म्हणणे खरे नाही की, मला मुतखडयाचा त्रास होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुतखडयाचे ऑपरेशन के. के. हॉस्पीटल, आळंदी पुणे येथे करण्यात आले, त्याचा खर्च गैरअर्जदाराच्या आई वडीलांनी केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि गैरअर्जदार पुणे येथे राहयला आलो त्यावेळी मी पी.सी.एम.टी मधील नौकरी सोडली व गैरअर्जदार हिला त्रास देण्यास सुरूवात केली. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार ही स्टाफ नर्सचे काम करते म्हणुन तिने उदरनिर्वाह चालवावा म्हणुन तिला त्रास देण्यास मी सुरूवात केली.

२३. हे म्हणणे खरे नाही की, मी घरामधील कोणताही स्वयंपाकाचा व औषध पाण्याचा खर्च करत नसल्याने गैरअर्जदाराने २०१७ साली स्टाफ नर्सची नौकरी करण्यास

सुरूवात केली. हे म्हणणे खरे आहे की, २०१७ साली गैरर्जदार ही इंद्रायणी हॉस्पीटल, आळंदी येथे स्टाफ नर्स म्हणुन रुजु झाली. हे म्हणणे खरे नाही की, २०२० साली माझ्या मुलाचा जन्म झाला त्यावेळी मी, माझे आई वडील मुलाला पाहण्याकरिता गैरअर्जदाराच्या माहेरी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिड वर्ष मुलाला पाहण्याकरिता कोणीच आले नाही म्हणुन गैरअर्जदाराचे मामा माझी समजुत काढण्याकरिता आमच्या घरी आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी व माझ्या वडीलांनी मला झारखंड येथे नौकरी लागणार आहे म्हणुन गैरअर्जदाराच्या वडीलांकडे व मामांकडे ७,००,०००/– रूपये दयावे म्हणुन तगादा लावला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर गैरअर्जदाराच्या वडीलांनी माझ्या खात्यावर रक्कम रूपये १,५०,०००/– ऑनलाईन जमा केले व ४ तोळे सोने देऊन गैरअर्जदार व मुलाला माझ्याकडे नांदण्यास पाठवुन दिले.

२४. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर गैरअर्जदार हिला मी गोजेगाव येथे सोडुन झारखंड येथे सदरची रक्कम घेऊन भरतीसाठी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, झारखंड येथे गेल्यानंतर मी माझा मोबाईल फोन बंद करून ठेवला. हे म्हणणे खरे नाही की, मी झारखंड येथे गेलो असताना माझ्या मुलाची तब्येत खराब झाली असताना माझ्या आई वडीलांनी त्याच्या औषधउपचाराचा खर्च करण्यास नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझ्या आई वडीलांनी गैरअर्जदार व तिच्या मुलाला नांदवणार नाही म्हणुन घरातुन हकलून दिले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गैरअर्जदार ही तिच्या माहेरी येऊन राहिली. हे म्हणणे खरे नाही की, मी झारखंड येथे असताना गैरअर्जदार हिला संपर्क साधता येत नव्हता म्हणुन ती मुलाला घेऊन तिच्या माहेरी राहिली.

२५. हे म्हणणे खरे नाही की, मी झारखंड येथुन परत आल्यानंतर सर्व हकीकत गैरअर्जदार हिने मला सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी गैरअर्जदाराला सांगितले की मी सर्व रक्कम खर्च करून आलो आहे व मला झारखंड येथे नौकरी लागली

नाही, तसेच मी गैरअर्जदाराला धमकावले की तिने मला पुन्हा रक्कम माहेरहुन आणुन दयावी तरच मी तिला नांदवेल.

२६. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हिला माझ्या विवाहबाहय संबंधाबाबत माहिती झाली त्यामुळे मुलावर त्याचे विपरीत परिणाम होऊ नये याकरिता गैरअर्जदार ही मुलासोबत पुणे येथे राहत आहे. गैरअर्जदार हिने मुलाला राजमाता इंग्लीश मिडीयम स्कुल, पुणे येथे शिक्षणासाठी दाखल केले आहे किंवा कसे याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुलाचा जन्म झाल्यापासून मी त्याची कुठलीही कायदेशीर जबाबदारी उचललेली नाही.

२७. हे म्हणणे खरे आहे की, दि.३०/०३/२०२२ रोजी गैरअर्जदार हिने महिला सहाय्यक कक्ष, पिंपरी चिंचवड, पुणे येथे तिचा संसार सुखाचा व्हावा व मी तिला नांदवण्यास घेऊन जावे याकरिता अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी विधीज्ञ श्री. यु. पी. शिंदे यांच्यामार्फत गैरअर्जदार हिला नांदण्यास येण्याकरिता नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर गैरअर्जदार हिने विधीज्ञ श्रीमती सिमा यांच्यामार्फत दि.११/०४/२०२२ रोजी नोटीस उत्तर पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या नोटीस उत्तरमध्ये मला सांगण्यात आले की, चार प्रतिष्ठीत लोकांसमक्ष गैरअर्जदार हिला चांगल्या प्रकारची नांदवण्याची हमी देऊन घेऊन जावे, तसेच गैरअर्जदार ही नांदण्यास तयार आहे.

२८. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. ४२ वरील अर्जामध्ये गैरअर्जदार ही माझ्याकडे ६ महिन्यापासून नांदत नाही व गैरअर्जदार माझ्यापासून ६ महिन्यापासून विभक्त राहते असे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०४/२०२२ रोजीच्या नोटीस उत्तरप्रमाणे मी गैरअर्जदारास चांगल्या प्रकारची नांदवण्याची हमी न देता सदरचे प्रकरण न्यायालयात दाखल केले.

२९. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. २ मधील मजकुर खोटा नमुद केला आहे. गैरअर्जदार हिने घरातुन ४ तोळे सोने नेले व तसेच मला धमकी दिली याबाबत मी कुठल्याही पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, गैरअर्जदार हिने घरातुन ४ तोळे सोने नेले व तसेच मला धमकी दिली याबाबत मी मुक्रांमबाद पोलीस ठाणे, जिल्हा नांदेड येथे लेखी तक्रार दिली. त्याची प्रत मी या प्रकरणात दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जातील व सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ५ व ६ मधील संपुर्ण मजकुर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अर्ज व सरतपासाच्या शपथपत्रामधील परिच्छेद क्र. ८ मध्ये गैरअर्जदार दि.१३/०७/२०२१ रोजी नोटीस पाठवली हे मी खोटे नमुद केले आहे.

३०. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अर्ज व सरतपासाच्या शपथपत्रामधील परिच्छेद क्र. ९ मध्ये गैरअर्जदार, तिचा भाऊ व वडीलांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली असे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हिने लिखीतमध्ये ती नांदण्यास तयार आहे, तिला चांगले नांदवा अशी मला विनंती केली असतानाही मी सदरचे प्रकरण न्यायालयात दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०५/२०२२ रोजी मला कोणतेही कारण घडले नसताना मी सदरचे खोटे प्रकरण दाखल केले आहे.

प्रश्न:- गैरअर्जदार ही तुमच्यासोबत पुणे येथे नांदण्यास तयार आहे, तुम्ही तिला नांदवण्यास तयार आहात का ?

उत्तर:- मी गैरअर्जदार हिला पुणे येथे नांदवण्यास तयार नाही.

३१. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हिने मला आजपर्यंत कुठल्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार माझ्यासोबत ७ वर्ष नांदलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचे खोटे प्रकरण दाखल करून खोटे सरतपासाचे शपथपत्र

दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.01.08 17:51:09 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–०८.०१.२०२६.

दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.